औद्योगिक सुरक्षा व
आरोग्य संचालनालय

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय

कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक - ई, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०० ०५१.

दुरध्वनी क्र.२६५७२५०४/०९/२२/५८ Email- dirdish.mum-mh@gov.in Website-www.mahadish.in

---

क्र. संऔसुवआ/अपघात/७३९० /७, दिनांक :- 02 JUL 2024

परिपत्रक क्र. : २२ /२०२४.

विषय : **महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षा) नियम, २०१४ अन्वये नूतनीकरण करण्यात आलेल्या सुरक्षा लेखा परीक्षकांच्या नूतनीकरणाचा कालावधी संपुष्टात आल्याबाबत.**

संदर्भ : **१) शासनाचे पत्र क्र. एफएसी-२०२४/प्र.क्र.५२/कामगार-४, दिनांक २५ ऑक्टोबर, २०२३.**

**२) शासन अधिसूचना क्र. एफएसी-२०२३/प्र.क्र.५२ (भाग २)/कामगार-४, दिनांक १९ जून, २०२४.**

**३) शासनाचे पत्र क्र. एफएसी-२०२४/प्र.क्र.५२/कामगार-४, दिनांक २० जून, २०२४.**

महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षा) नियम, २०१४ अन्वये महाराष्ट्रातील नोंदणीकृत कारखान्यांचे सुरक्षा लेखा परीक्षण करणेकरीता शासनाच्या संदर्भ क्र. १ च्या आदेशान्वये १७ सुरक्षा लेखा परीक्षकांना “महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षा) नियम, २०१४ मध्ये करण्यात येणाऱ्या सुधारणांची अंतिम अधिसूचना प्रसिद्ध होईपर्यंत अथवा १ वर्ष यापैकी जे अगोदर घडेल” त्यानुसार प्रमाणपत्र नूतनीकरण करण्यास मान्यता देण्यात आली होती.

तद्नंतर संदर्भ क्र. २ नुसार महाराष्ट्र कारखाने (सुरक्षा लेखा परीक्षा) नियम, २०१४ मध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत (प्रत संलग्न). त्यानुसार शासनाने संदर्भिय पत्र क्र. ३ नुसार यापूर्वी शासनमान्य सुरक्षा लेखा परीक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आलेल्या सर्व सुरक्षा लेखा परीक्षकाचा कालावधी संपुष्टात आलेला आहे, असे कळविलेले आहे. त्यामुळे उपरोक्त अधिसूचना प्रसिद्ध झालेल्या दिनांकापासून यापूर्वी मान्यता मिळालेल्या सुरक्षा लेखा परीक्षकांनी केलेले सुरक्षा लेखा परीक्षण ग्राह्य धरले जाणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी व याबाबतच्या सुचना आपण आपल्या विभागातील सर्व अधिकारी व कारखाना व्यवस्थापन यांना त्वरित देण्यात याव्यात.

(दिपक पोकळे)
संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीकरीता सादर :

१) सर्व अपर / सह संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय.

२) सांख्यिकी शाखा.

३) नस्ती.